MHKO100011382020

## नि.दि.दावा क्र.१४/२०२० मधील निशाणी क्र. ७९ व ८० वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं.१ श्री.संभाजी केरबा देसाई यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. सदरचा दावा चालू असताना यातील प्रतिवादी नं.१ श्री.संभाजी केरबा देसाई हे दिनांक २३/०७/२०२५ रोजी मयत झाले. तथापि मयत प्रतिवादी नं.१ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी नं.१ श्री.संभाजी केरबा देसाई हे दिनांक २३/०७/२०२५ रोजी मयत झाले. प्रस्तुत कामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी नं.१ यांचे वारस हे नोकरीनिमित्त बाहेरगावी असलेने त्यांना मयत प्रतिवादी यांचा मृत्यु दाखला मुदतीत प्राप्त करून घेता आला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचे वारस यांना मुदतीत आपल्या वकीलांना भेटून सदरची गोष्ट सांगता न आलेने वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झाला आहे. सबब, प्रतिवादी नं.१ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ करणेत व त्या अनुषंगाने झालेला अबेंटमेंटचा आदेश रद्द करून सोबत जोडले वारस रेकॉर्डवर आणणेस परवानगी मिळावी ही विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास त्याच अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, अर्जातील कारणे चुकीची आहेत. वादी व प्रतिवादी नं.१ हे एकाच गावचे रहिवाशी आहेत व जवळच राहणेस होते. त्यामुळे त्यांची मयत झालेची

कल्पना नव्हती हे विधान न पटणारे आहे. सबब, अर्ज मंजूर करणेचा झालेस वादीवर जास्तीत जास्त खर्च बसविण्याची विनंती केली.

३. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील व म्हणणेतील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

४. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापनासाठी, कब्जासाठी व अज्ञार्थी मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं.१ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे वादी किंवा प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र.१ संभाजी देसाई दिनांक २३/०७/२०२५ रोजी मयत झाले नाहीत असे प्रतिवादीतर्फे दाखल केलेल्या म्हणण्यात नमुद केले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ दिनांक २३/०७/२०२५ रोजी मयत झालेबाबत वादीने शपथेवर केलेले कथन बरोबर असल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यास दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांनी वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांनी केलेल्या उशिराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचे अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. प्रतिवादी यांना रक्कम रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे मात्र) खर्चादाखल देणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.

२. प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.05.05 18:09:24 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०५/०५/२०२६

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर
गडहिंग्लज.